जिल्हा परिषद, बांधकाम विभागातर्फे देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा (BOT सह) व ते काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमानिधीकडे उतरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्र.पंरास-२०१५/प्र.क्र.३४६/बांध-३
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक :- ५ आक्टोंबर २०१८

शासन परिपत्रक

जिल्हा परिषदांअंतर्गत रस्ते, इमारती व इतर विविध बांधकामे केली जातात. तथापि अशी बांधकामे करताना प्रत्यक्ष काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की , सदर विमा हा विहित मुदतीमध्ये काढला जात नाही अथवा कंत्राटदाराने सदर विम्याची रक्कम न भरल्यास कंत्राटदाराच्या बिलामधून कपात करण्यात येते. त्यामुळे सदर कालावधीमध्ये अपघात घडल्यास अपघातग्रस्त कामगारास विम्याचे संरक्षण मिळू शकत नाही. तसेच पंचायती राज समितीने देखील त्यांच्या जिल्हा परिषदांच्या भेटी दरम्यान याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील बांधकामांची कंत्राटे देताना निविदेतील अटी व शर्तीनुसार बांधकाम कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश घेते वेळी (कामगारांचा वा कारागीरांचा) विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. तसे केल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

तसेच बांधकाम कंत्राटदाराने कामगारांचा वा कारागीरांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविला किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांची राहील .बांधकाम कंत्राटदाराने विमा उतरविल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात यावा.

या परिपत्रकातील सूचनांचे काटेकोर पालन करण्याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

(प्रकाश वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३. संचालक, विमा संचालनालय, गृह निर्माण भवन (म्हाडा), रुम नं.६४, पहिला मजला, वांद्रे पूर्व मुंबई
४. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५. कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद (सर्व)
६. सर्व कार्यासन अधिकारी, ग्राम विकास विभाग
७. निवडनस्ती बांधकाम ३